CMYK

पोटात गर्भ असलेल्या बाळाला महिलेने दिला जन्म >>पान 2

निबंध स्पर्धेमुळे भगवान महावीर यांचे जीवनकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचेल - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन >>पान 3

प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या कामांना गती द्या - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

**सुविचार**

ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी धैर्य आणि सातत्य आवश्यक आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



सलमान-रश्मिका यांची जोडी पुन्हा एकदा जमणार!

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 174 ■ मंगळवार, दि. 04 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# कोट्यावधी रुपयांच्या कामाला भ्रष्टाचाराची वाळवी?

## चौकशी थंडबस्त्यात

## तालुक्यातील जलजीवन मिशनचे काम अर्धवट

भाग ३







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर : नागरिकांना ५५ लिटर शुद्ध व मुबलक पाणी मिळावे, या उदात्त हेतून कोट्यवधी रुपयाचा खर्च करून करण्यात येत असलेल्या जीवन मिशनच्या कामाला तालुक्यात भ्रष्टाचाराची वाळवी लागली..? सदर कामाबाबत तक्रारी झाल्यानंतरही व कामे हे वेळेत पूर्ण न होता अर्धवट असल्यानंतर चौकशी करण्याचे कामही थंड बस्त्यात पडले आहे. त्यामुळे ही योजना संशयाच्या भोवऱ्यात अडकली असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येते आहे.**

मेहकर तालुक्यातील ग्रामीण भागात सन २०२१ २०२२ पासून जिल्ह्यात जल जीवन मिशन योजनांच्या कामाला प्रारंभ झाला. परंतु अद्यापही हे कामे पूर्ण झाली नाहीत. तर, या कामात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाला आहे. सदर कामे पुर्ण करण्यासाठी प्रशासकीय स्तरावरुन योग्य ती पाऊले उचलण्याची गरज असताना याकडेही दुर्लक्ष केले गेले आहे. ग्रामीण भागातील जनतेला नळ जोडणीच्या माध्यमातून शुध्द व स्वच्छ पाणी देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलजीवन मिशन योजना आणली.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

सन २०२४ पर्यंत ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापुर्ण पाणीपुरवठा करण्याचे जल जीवन मिशनचे मुख्य उदिष्ट होते. या योजनेंतर्गत मेहकर तालुक्यातील ९२ गावांत जलजीवन योजनेवर कामे टाकण्यात आले. सन २०२१,२०२२ मध्ये निविदा प्रक्रीयाही पार पडली. सन २०२१,२०२२ पासून बहुतांश कामाला सुरवात झाली. काही कामांची निविदा नंतर होऊन कामाची कामाची संख्या वाढत गेली. मात्र, अल्पावधीतच अनेक गावातून कामांबाबत तक्रारी देखील वाढल्या. कंत्राटदारांकडून कामात दिरंगाई होत असल्याचा आरोपही झाला. मात्र, त्यानंतर जल जीवन मिशनच्या कामात कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. अधिकारी पदाधिकाऱ्यांनी केवळ आपसी समझोता करीत शासनाच्या कोट्यावधी रुपयाल चुना लावण्याचे काम केले जात असल्याचा संतप्त प्रतिक्रिया आता तालुक्यातील नागरिकांमध्ये उमटत आहेत.कोट्यवधी रुपयाची कामे होत असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज होती. मात्र, कमिशनखोरीच्या गर्तेत जलजीवन मिशनशी योजना अडकली .? तालुक्यातील कामाला सर्वत्र घरघर लागली असल्याचे चित्र दिसून येत आहे. सदर कामाबाबत अनेक तक्रारी झाल्यानंतरही या कामाची चौकशीही थंड बसतात असल्याने जल जीवन मिशन ची योजना ची संशयाच्या भोवऱ्यात असल्याची चर्चा संपूर्ण तालुक्यामध्ये होत आहे.

### पाणीपुरवठा मंत्र्याच्या चौकशीचे आदेश हवेत जीरले..?

मेहकर लोणार मतदार संघामध्ये करण्यात येत असलेल्या जलजीवन विषयांच्या कामात मोठ्या प्रमाणात दिरंगाई व गैरप्रकार झाल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्यानंतर तत्कालीन आमदार डॉ.संजय रायमुलकर यांनी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या सोबत ऑगस्ट २०२४ मध्ये बैठक घेऊन मेहकर व लोणार तालुक्यातील जलजीवन मिशनच्या योजनेच्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी केली होती. तर, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी तात्काळ चौकशी आदेश दिल्याचे सूत्रांची माहिती होती.मात्र, अद्यापही चौकशी झाली नसल्याने ही चौकशी करणार कोण व कोणाची चौकशी होणार असा प्रश्न मेहकर मतदार संघातील चर्चेला जात आहे. आमदार आणि मंत्र्याच्या आदेशाला संबंधित विभाग जुमानत नसेल तर सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारीची काय स्थिती असेल हे दिसून येत आहे..

## स्कूल व्हॅन चालकाचे चिमुकलीसोबत गैरकृत्य, पालकांची पोलिसांकडे तक्रार

**भंडारा/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांना घेण्यासाठी स्कूल व्हॅन घरी पोहचली. व्हॅन चालकासोबत थोरली बहीण आणि धाकटा भाऊ शाळेला जायला निघाले. मात्र व्हॅन चालकाने लहान भावास मागे आणि मोठ्या बहिणीला समोरच्या सीटवर बसण्यास सांगितले. काही अंतरावर गेल्यानंतर चालकाने चिमुकली सोबत गैरकृत्य केले. मुलगी रडत रडत घरी आली. आईने विचारल्यावर मुलीने तिच्यासोबत चालकाने केलेल्या गैरकृत्याची माहिती दिली. आई -वडिलांनी भंडारा पोलीस ठाण्यात व्हॅन चालकाविरोधात तक्रार दिली आहे. पोलिसांनी व्हॅन चालकाविरोधत पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. व्हॅन चालक फरार आहे. स्थानिक रॉयल पब्लिक स्कूलमध्ये शिकणाऱ्या एका १० वर्षीय चिमुकलीसोबत वरील प्रकार शनिवारी दुपारी घडला. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीनुसार, मुलगी शाळेतून रडत-रडत आली. व्हॅन चालक सुभाष फत्तुजी नेवारे (वय-३५ वर्षे, रा. विद्या नगर भंडारा) १ जानेवारी रोजी सकाळी ८:४५ वाजता मुलांना शाळेत नेण्यासाठी घरी आला. मुलीला त्याच्या समोरच्या सीटवर बसवले. घरापासुन काही अंतर पुढे गेल्यावर व मुलीच्या लहान भावाला व्हॅनच्या मागील सीटवर बसण्यास सांगितले. समोर कुणी नसल्याचा फायदा घेत चालक सुभाष नेवारे याने मुलीला स्पर्श करण्यास सूरवात केली. मुलीने त्याला नकार दिला परंतु तो तसेच करत होता.

## "मराठ्यांचे किती बळी हवेत?" मनोज जरांगेंचा सरकारला इशारा, "आरक्षण द्या नाहीतर..."

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मुद्यावरून मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. सरकारला मराठ्यांचे किती बळी हवेत असा आर्त सवाल करताना त्यांनी गंभीर इशाराही दिला आहे. आरक्षण १०० टक्के मिळणारच असून जिव्हारी लागेल असे टोकाचे पाऊल उचलू नका, असे आवाहनही जरांगे यांनी मराठा समाजाला केले आहे. काही दिवसांपूर्वी मराठा आरक्षणासाठी काहींनी आत्महत्या केली असल्याचे समोर आले होते.

मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आपली भूमिका स्पष्ट करताना आगामी काळात आंदोलन उभारण्याचे संकेत दिले. मनोज जरांगे यांनी म्हटले की, मराठा बांधवांना विनंती आहे, आरक्षण १०० टक्के मिळणार आहे. जिव्हारी लागेल असे काम करू नका. बीड, जालना, सिल्लोड येथे आत्महत्या करण्यात आले. आत्म हत्या करू नका असे आवाहन त्यांनी केले.



मनोज जरांगे यांनी म्हटले की. मराठा आरक्षणासाठी तुम्हाला नेमके किती बळी हवे आहेत. मराठ्यांची लेकरं देखील तुमचं लेकरं आहे असे समजा असे आवाहन करताना तुम्हाला किती बळी घ्यायचे आहेत असा सवाल केला. मुख्यमंत्री तुम्ही आरक्षण देत नाही, ही कोणती मग्रुरी आहे. आम्हाला वेगळं आंदोलन करून तुम्हाला जेरीस आणावे लागेल. मुख्यमंत्र्यांनी तातडीने आरक्षण द्यावे अन्यथा आमचा संयम सुटणार असल्याचा इशारा त्यांनी दिला. तुम्ही आमची मज्जा पाहणार असाल तर तुम्हाला याची फळं भोगावी लागतील असेही जरांगे यांनी म्हटले.

मनोज जरांगे यांनी म्हटले की, मुख्यमंत्री तुम्हाला माणुसकी नाही का? मराठ्यांचे मुडदे पडू देऊ नका, पोरं धडाधड आत्महत्या करत आहेत. तुम्हाला मराठा समाजाची दयामाया येत नाही. तुमच्यामुळे आमच्या आत्महत्या होत असल्याचेही जरांगे यांनी म्हटले.

## खोटी माहिती देणाऱ्या 'लाडक्या बहिणी'वर गुन्हा दाखल!

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत अर्जाची फेरतपासणी सुरू असून, निकष पूर्ण न करणाऱ्या तसेच बनावट कागदपत्रे लाभार्थ्यांवर कारवाई होत आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे योजनेचा लाभ घेणाऱ्या काही लाडक्या बहिणींवर पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत बनावट लाभार्थ्यांची नोंदणी करण्याचा गैरप्रकार हा स्थानिक अंगणवाडी सेविकांच्या सजगतेमुळे अर्ज पडताळणीच्या वेळी सप्टेंबर महिन्यातच निदर्शनास आला आहे. याबाबत ४ ऑक्टोबर रोजी पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे आदिती तटकरे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सांगितले. तसेच सखोल चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. महिला व बालविकास विभाग अर्जदारांच्या छाननीबाबत अत्यंत सजग असून कोणत्याही प्रकारची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे, असे आदिती तटकरे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.

## एकनाथ शिंदे यांचे खरंच काही बिनसलंय? भाई अजूनही नाराज?

### मुख्यमंत्र्यांनी बोलाविलेल्या बैठकीला दांडी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलाविलेल्या अतिशय महत्त्वाच्या बैठकीला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दांडी मारली आहे. या बैठकीला दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित आहेत. मात्र एकनाथ शिंदे यांची गैरहजेरी अनेकांच्या डोळ्यात भरणारी आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे नव्या सरकारमध्ये अजूनही नाराज आहेत का? असा प्रश्न विचारला जात आहे.

राज्यातील महत्वाच्या विकासकामांसंबंधी आणि प्रकल्पांसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयात बैठक बोलावली होती. सोमवारी दुपारी सव्वा तीन वाजता बैठकीला सुरूवात झाली. मुख्यमंत्री फडणवीस



आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासहित वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठकीला उपस्थिती आहे.

बैठकीला समाज कल्याण, पाणी पुरवठा अशा खात्यांचे मंत्री आणि अधिकारीही उपस्थित आहेत. एकनाथ शिंदे यांच्या गृहनिर्माण हे अतिशय महत्त्वाचे खाते असतानाही बैठकीला त्यांची अनुपस्थिती असल्याने उलट सुलट चर्चांना सुरुवात झाली आहे.

एकनाथ शिंदे सरकारमध्ये नाराज?

नव्या सरकारमधील खातेवाटपावरून आणि पालकमंत्रिपदाचा वाद आहेत. सरकार स्थापन होऊन जवळपास दोन महिने उलटलेले असतानाही महायुतीतील आणि सरकारमधील वाद शमविण्यात प्रमुख नेत्यांना यश आलेले नाही. सरकारमध्ये आपली गळचेपी होत असल्याची भावना शिवसेनेच्या मंत्र्यांमध्ये आहे. त्याचवरून नव्या सरकारमध्ये एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सातत्याने रंगते. मागील महिन्यातच एकनाथ शिंदे नाराजीतून मूळगावी दरे गावात गेले होते.

आताही मुख्यमंत्र्यांनी प्रमुख बैठक बोलावलेली असतानाही एकनाथ शिंदे गैरहजर राहून ठाण्यात असल्याने नाराजीच्या चर्चांना अधिक बळ मिळते आहे. दुसरीकडे उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून एकनाथ शिंदे यांचे दिवसभरात कोणतेही कार्यक्रम नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहेत.

मागील आठड्यात संपन्न झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दांडी मारली होती. व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजेरी लावून एकमेकांसमोर येणे त्यांनी टाळले असल्याची चर्चा झाली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बैठकीत

## नागपूर विभागासाठी १ हजार ७६३ कोटींचा जिल्हा वार्षिक सर्वसाधारण आराखडा सादर

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ चा प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांची बैठक उमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज पार पडली. जिल्हा वार्षिक योजनेचा (सर्वसाधारण) सन २०२५-२६ साठी शासनाने कळविलेल्या आर्थिक मर्यादेत नागपूर विभागाचा १ हजार ७६३ कोटी ७० लक्ष रूपयांचा आराखडा सादर करण्यात आला.

याबैठकीस उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जिल्हानिहाय सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेचा संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच जिल्हाधिकारी यांचा दूरदृष्यप्रणालीद्वारे आढावा घेतला तसेच जिल्ह्यातील विविध विकास योजनावरही याबैठकीत चर्चा करण्यात आली.

यावेळी पालकमंत्र्यांसह वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल,



खासदार, आमदार जिल्ह्यांचे पालकसचिव, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, अतिरीक्त मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, उपायुक्त नियोजन अनिल गोतमारे, जिल्हा नियोजन अधिकारी उपस्थित होते.

नागपूर विभागातील जिल्ह्यांनी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ च्या प्रारूप आरखड्यास जिल्हा नियोजन समितीची शासनाने कळविलेल्या आर्थिक मर्यादेत मान्यता घेतली आहे. यानुसार नागपूर जिल्ह्यासाठी ५०९.६ कोटी, वर्धा २०७.२२ कोटी, भंडारा १७३.२७ कोटी, गोंदिया १९८.५१ कोटी, चंद्रपूर ३४०.८८ कोटी तर गडचिरोली जिल्ह्यासाठी ३३४.७६ कोटी रूपयांच्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक आराखडा सादर करण्यात आला आहे.

नागपूर विभागाच्या जिल्हा वार्षिक योजना प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठीचा बैठकीस नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर, भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय सावकारे, गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री बाबासाहेब पाटील, चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईक, गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री आशिष जयस्वाल, प्रभारी विभागीय आयुक्त डॉ. माधवी खोडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर (नागपूर), वान्मती शी (वर्धा), संजय कोलते (भंडारा), प्रदिप नायर (गोंदिया), अविशांत पंडा (गडचिरोली) आणि विनय गौडा (चंद्रपूर) आदी दुरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

CMYK

## फेसबुकचा वाढदिवस!


विज्ञानामुळे जग जवळ आले आहे असे लहानपणी ऐकले होते ; पण याची खरी प्रचिती फेसबूक या सोशल नेटवर्किंग साईटमुळेच आली. फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईटला आज म्हणजे ४ फेब्रुवारी रोजी २१ वर्ष पूर्ण झाली . याचाच अर्थ आज फेसबुकचा एकविसावा वाढदिवस आहे. आज जगभरात फेसबुक वापरणाऱ्यांची संख्या दोनशे कोटीहून अधिक आहे. अमेरिकेत माहिती गोळा करणाऱ्या पुस्तकाला फेसबुक असे म्हंटले जाते. अमेरिकेत जेंव्हा डिजिटल युगाची सुरुवात झाली तेंव्हा ही माहिती डिजिटल स्वरूपात आणण्याचे आव्हान मार्क झुकरबर्ग या तरुण मुलाने स्वीकारले. हार्वर्ड विद्यापीठात शिकत असलेल्या मार्कने डस्टिन मॉस्कोविट्स, अँड्रयूआर्डो सर्विन आणि ख्रिस ह्युजेस या आपल्या मित्रांच्या सोबतीने फेसबुकची स्थापना केली. ४ फेब्रुवारी २००४ रोजी मार्कने हार्वर्ड विद्यापीठाच्या वसतिगृहात फेसबुक सुरू केले. अल्पावधीतच या सोशल नेटवर्किंग साईटने तरुणांना अक्षरशः वेड लावले. फेसबुक आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेटवर्किंग साईट बनली आहे. २१ वर्षापूर्वी मार्कने जे रोपटे लावले त्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. जगातील जवळपास बारा देशात फेसबुकची कार्यालये आहेत. फेसबुकची आज पाच हजार कोटींची उलाढाल आहे. फेसबुकला मिळणाऱ्या जाहिरातींमुळे फेसबुकला विनामूल्य सेवा देणे शक्य झाले आहे. १८ मे २०१२ ला फेसबुकने आपले शेअर विकायला काढले या शेअर्सने बाजारात धुमाकूळ घातला. या शेअर्समुळे फेसबुकला कोट्यवधी रुपयांचा फायदा झाला. आज फेसबुकने व्हॉट्सप आणि इंस्टाग्राम या नेटवर्किंग साईटसना देखील आपल्या कवेत घेतले आहे. फेसबुकची वाढती लोकप्रियता पाहून गुगलने फेसबुक विकत घेण्याचा प्रस्ताव मार्क झुकरबर्ग समोर ठेवला मात्र त्याने तो फेटाळून लावला. इंटरनेट विश्र्वात गुगल नंतर सर्वात जास्त विजिट होणारी वेबसाईट फेसबुक हीच आहे. आजच्या युगात फेसबुक हा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनला आहे. फेसबुक निर्मितीचे एकमेकांशी संवाद साधने, मतप्रदर्शन आणि देवाणघेवाण हे मुख्य उद्देश होते व आजही कायम आहेत. यासोबतच नवनवीन फीचर्स फेसबुक वापरकर्त्यांसाठी आणते. फेसबुक आज अनेकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. फेसबुकवर एका वापर कर्त्याचे सरासरी पाचशे मित्र आहेत तो दररोज दहा लोकांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवतो किंवा स्वीकारतो फेसबुकवर आज इतके युजर्स आहेत की त्या सर्वांचे एक कुटुंब करायचे म्हटलं तर त्या कुटुंबाची लोकसंख्या जगातील कोणत्याही देशातील लोकसंख्येपेक्षा अधिक असेल. हे विश्वची माझे घर.... या उक्तीप्रमाणे संपूर्ण विश्वाला एक कुटुंब बनवण्याचे काम फेसबुकने केले आहे. फेसबुकला २१ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# पोटात गर्भ असलेल्या बाळाला महिलेने दिला जन्म

## स्त्री रुग्णालयात सिझर : डॉक्टरांच्या टीमला यश; बाळ-बाळंतीण सुखरूप





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** नऊ महिन्यांची गर्भवती असलेल्या ३२ वर्षीय महिलेच्या गर्भातील अर्भकाच्या पोटात साडेचार महिन्यांचा गर्भ असल्याचे निदान काही दिवसांपूर्वी जिल्हा महिला रुग्णालयात झाले होते. या दुर्मीळ घटनेने सर्वत्र आश्र्चर्य व्यक्त केल्या गेले. स्त्री रुग्णालयात १ फेब्रुवारीला सायंकाळी डॉक्टरांनी या महिलेचे यशस्वी सिझर केले.महिलेने मुलास जन्म दिला असून, बाळ आणि माता दोघांचीही प्रकृती उत्तम आहे.

पाच लाखांमधून एक आढळणाऱ्या या प्रकाराला वैद्यकीय भाषेत 'फिटस इन फिटो' म्हटले जाते. नऊ महिन्यांची गर्भवती असलेली ३२ वर्षीय महिला काही दिवसांपूर्वी येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात सोनोग्राफी करण्यासाठी आली होती. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रसाद अग्रवाल यांनी सोनोग्राफी केली असता महिलेच्या गर्भातील अर्भकाच्या पोटामध्ये आणखी एक अर्भक असल्याचे निदान झाले होते. बाळाच्या पोटात साडेचार महिन्यांचे अर्भक होते. निदानानंतर समुपदेशन करत कुठलाही धोका नसल्याचे गर्भवतीस सांगण्यात आले होते.

दरम्यान, १ फेब्रुवारीला प्रसववेदना सुरू झाल्याने महिलेस नातेवाइकांनी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल केले. कर्तव्यावरील डॉक्टरांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रशांत पाटील यांना कळविले. ही बाब जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या कानावर घालण्यात आली आणि वेळ न दवडता महिलेची प्रसूती येथेच करण्याचे ठरविण्यात आले.सायंकाळी साडेसात वाजता महिलेस 'ओटी'त घेऊन सिझर करण्यात आले.. महिलेच्या गर्भात पूर्णतः वाढ झालेल्या बाळाच्या पोटात आणखी एक गर्भ दिसत असल्याने ही केस डॉक्टरांसाठी आव्हानात्मक होती. सिझर करून महिला व अर्भक दोघांचाही जीव वाचविणे महत्त्वाचे होते. त्यासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ, भूलतज्ज्ञ आणि बालरोगतज्ज्ञ सज्ज ठेवण्यात आले होते. जन्माला आलेले बाळ २ किलो ३०० ग्रॅम वजनाचे आहे.त्याला नवजात शिशू विभागात ठेऊन रात्रभर उपचार करण्यात आले. प्रकृती स्थीर झाल्यानंतर त्याला अमरावती येथील संदर्भीय सेवा रुग्णालयात पाठविण्यात आल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी दिली.

## कृषी क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर 'एआय'चा वापर करण्यासाठी सहकार विभागासोबत समन्वय करून प्रकल्पाची व्यवहार्यता तपासून घ्यावी – उपमुख्यमंत्री अजित पवार



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी येत्या काळात कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा ('एआय'चा) वापर अनिवार्य आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती घडविण्यासाठी कृषी क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन आहे. त्यासाठी कृषी विभागाने सहकार विभागासोबत समन्वय करून या प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले.

राज्यातील कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करण्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल (दूरदृष्यप्रणालीद्वारे), सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, अखिल भारतीय द्राक्ष बागायत संघाचे अध्यक्ष कैलास पाटील, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे (व्यय) प्रधान सचिव सौरभ विजय, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त कुणाल खेमनार, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक परिमल सिंग, सहकार विभागाचे सहसचिव संतोष पाटील, बारामती कृषी विज्ञान केंद्राचे प्रा. निलेश नलावडे, प्रा. योगेश फाटके, प्रा. तुषार जाधव, प्रा. शरद ताटे उपस्थित होते.



उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, जगभरातील प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे क्रांतिकारी बदल घडत आहेत. कृषी क्षेत्र सुद्धा याला अपवाद नाही. येत्या काळात बदलते हवामान, अवेळी पडणारा पाऊस, पीकांवर वारंवार होणारा रोगांचा प्रादुर्भाव, मजुरांचा तुटवडा यांवर मात करत शेतकऱ्यांचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यांच्या उत्पादन खर्चात बचत करण्यासाठी कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेला पर्याय नाही. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पीक आरोग्याचे विषण, मातीतील कार्बन प्रमाण शोधणे, मातीच्या आरोग्याची सविस्तर माहिती, तणाचा प्रकार ओळखणे, पूर्वीच्या उत्पन्नाची तुलना, मातीचे तापमान, वातावरणातील आर्द्रता, पिकांवरील कीड व रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे, तसेच पिकांवरील जैविक-अजैविक ताण ओळखणे शक्य होणार आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पीकांच्या उत्पादनात वाढ, मजुरी खर्चात बचत, रसायनिक खते व औषधांच्या वापरात कपात, कापणी कार्यक्षमतेत वाढ, रोगनियंत्रणाद्वारे बचत, पुरवठा साखळीतील कार्यक्षमतेत वाढ आणि एकूण खर्चात कपात होणे शक्य होईल. राज्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक आणि आमूलाग्र बदल घडविण्यासाठी कृषी क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विचाराधीन आहे. त्यासाठी कृषी विभागाने सहकार विभागासोबत समन्वय करून या प्रकल्पाची तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता तपासून पाहावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

## सलमान-रश्मिका यांची जोडी पुन्हा एकदा जमणार!

### 'सिकंदर'नंतर आता दोघेही 'या' चित्रपटात करणार रोमान्स!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून बॉलिवुडचा दबंग अभिनेता सलमान खान आणि नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली रश्मिका मंदाना यांच्या सिकंदर या चित्रपटाची चांगलीच चर्चा होत आहे. हा चित्रपट येत्या २८ मार्च रोजी देशभरात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे आतापासूनच जोरदार प्रमोशन केले जात आहे. असे असतानाचा आता सलमान खान आणि रश्मिका मंदाना हे दोघेही आणखी एका नव्या चित्रपटात दिसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे दिग्गज दिग्दर्शक अटली हा या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे.

सलमान खान आणि रश्मिका मंदाना यांच्या फॅन्ससाठी एक मोठी खुशखबर समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ते 'A6' या चित्रपटात एकत्र दिसण्याची शक्यता आहे. सिकंदर या चित्रपटात या दोघेही कपल म्हणून दिसणार आहेत. म्हणजेच या दोघांमध्ये रोमँटिक रिलेशन या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. असे असतानाच आता ही जोडी पुन्हा एकदा 'A6' या चित्रपटात एकत्र दिसू शकते. तशी शक्यता व्यक्त केली जात आहे. रश्मिका मंदानाने पुष्पा-२ या चित्रपटात केलेला अभिनय सलमान खान आणि अटली या दोघांनाही पसंद पडल्याचं बोललं जातंय. त्यामुळेच पुन्हा एकदा सलमान खानसोबत रश्मिका दिसणार आहे, असे म्हटले जात आहे. गेल्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यात अटलीने सलमान खानसोबतच्या नव्या चित्रपटाबाबत माहिती दिली होती. या चित्रपटात सलमान खान प्रमुख नायकाच्या भूमिकेत असेल, असे तेव्हा अटलीलने सांगितले होते. याच चित्रपटाचे नाव 'A6' असे असून लवकरच त्यावर काम चालू होईल, असे सांगितले आहे.

सध्या छावा चित्रपटाच्या प्रमोशमध्ये रश्मिका व्यग्र

रश्मिका मंदानाचा छावा नावाचा चित्रपट येत्या १४ फेब्रुवारी रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात तिने अभिनेता विकी कौशलसोबत स्क्रीन शेअर केलेली आहे. हा चित्रपट छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित आहे. रश्मिका सध्या याच चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे.

सलमानचा सिकंदर चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार

दरम्यान, सलमान आणि रश्मिका यांच्या सिकंदर या चित्रपटाचेही टिझर गेल्या महिन्यात प्रदर्शित झालेले आहे. या चित्रपटात सलमान खान डॅशिंग लुकमध्ये दिसतोय. याच चित्रपटात रश्मिका मंदानासुद्धा दिसेल. त्यामुळे हा चित्रपट काय कमाल करून दाखवणार, याकडे सर्वांचेच लागले आहे.

## काउंटरवर तिकीट खरेदी करण्यासाठी नांदेड विभागातील सर्व ७० स्थानकांवर तिकीट काउंटरवर क्युआर कोड सुविधा सक्षम

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** सुरुवातीला काही प्रमुख स्थानकांवर सुरू करण्यात आलेली सुविधा आता विभागातील सर्व ७० स्थानकांवर विस्तारित करण्यात आली आहे.

नांदेड विभाग व्यवसाय सुलभ करण्यासाठी आणि आर्थिक व्यवहार कमी करण्यासाठी सर्वत्र डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देत आहे. अधिक मार्गांनी कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि सामान्य बुकिंग आणि आरक्षण काउंटरवरही डिजिटल पेमेंट वाढवण्यासाठी, नांदेड विभागाने तिकीट खरेदीसाठी क्युआर (क्विक रिस्पॉन्स) कोडद्वारे तिकीट भाडे भरण्याची अतिरिक्त सुविधा सुरू केली आहे. यामुळे त्वरित तिकिटे खरेदी करण्याव्यतिरिक्त रोख पैसे घेऊन जाण्याची आणि टिकीटाची अचूक रक्कम देणे सुलभ होईल.

नांदेड विभागातील सर्व ७० स्थानकांच्या सर्व तिकीट काउंटरवर तिकीट खिडकीच्या बाहेर स्वतंत्र उपकरणे देण्यात आली आहेत. तिकिट जारी करण्यासाठीचे सर्व संबंधित तपशील सिस्टीममध्ये भरल्यानंतर, पेमेंट स्वीकारण्यापूर्वी, या उपकरणांवर क्युआर कोड प्रदर्शित केला जातो आणि तो प्रवासी मोबाईल फोनमध्ये असलेल्या पेमेंट ॲप्सद्वारे स्कॅन करू शकतात. रक्कम मिळाल्याची खात्री झाल्यानंतर, तिकीट तयार केले जाईल आणि प्रवाशाला दिले जाईल.

रेल्वे वापरकर्त्यांसाठी कॅशलेस व्यवहाराची ही सुविधा सुरुवातीला महत्त्वाच्या स्थानकांच्या प्रमुख काउंटरवर लागू करण्यात आली होती, ती आता विभागातील सर्व काउंटरवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

श्रीमती नीति सरकार, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, नांदेड विभाग यांनी तिकीट काउंटरवर तिकीट खरेदी करण्यासाठी प्रवाशांच्या फायद्यासाठी आणखी एक डिजिटल पेमेंट पर्याय सादर केल्याबद्दल वाणिज्य विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले आहे. त्यांनी सर्व रेल्वे वापरकर्त्यांना तिकिट खरेदीसाठी या संधीचा उपयोग करण्याचे आवाहन केले जे त्यांना टिकीटाची अचूक रक्कम देण्या करीता आणि चलन हाताळण्यात त्यांना खूप मदत करेल.

# मांडवा येथे सेवानिवृत्त सैनिकाचा सत्कार सोहळा उत्साहात

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** मांडवा येथील सैनिक भालचंद्र खुशालराव तारे यांनी देशाची २४ वर्ष सेवा करून झाल्यावर घरी परतत असताना गावात नागरी सत्कार सन्मान सोहळ्याचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. बीबी पासून जवळच असलेल्या मांडवा गावाची ओळख म्हणजे फौजी मांडवा म्हणून ओळख आहे.

गाव जरी छोटासे असलं तरी कीर्ती महान आहे या गावांमध्ये सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने आनंदाने एकजुटीने राहतात तसेच सर्व धर्मीयांचे प्रार्थना स्थळे या गावांमध्ये आहेत. त्यामुळे या गावांमध्ये एकीचे दर्शन घडते. या गावांमध्ये ४० ते ५० माजी सैनिक आहेत. हाच वसा घेऊन मांडवा येथील ६० ते ७० तरुण देशसेवा करण्यासाठी सीमेवर कार्यरत आहेत. कार्य करत





शत्रुशी झुंज देत असताना योगेश दराडे हा जवान शहीद झाला असतानाही मांडवा येथील तरुणांनी देशसेवेची जिद्द सोडली नाही. असे असताना दरवर्षी एक ना एक सैनिक सेवानिवृत्त होऊन गावी येत असतो. तर एक दोन नवीन भरती होत असतात त्यामुळे सीमेवर जात असताना गावकरी त्याचे औक्षण करून आशीर्वाद देतात. तर सेवानिवृत्त होऊन घरी मायदेशी मातृभूमीत आल्यावर सुद्धा मोठ्या जल्लोषात ढोल ताशाच्या गजरात वाजत गाजत देशभक्तीपर गीत नारे देऊन मोठ्या उत्साहाने गावकरी फुलांची उधळण करून स्वागत सत्कार समारंभ करत असतात २ फेब्रुवारी रोजी भालचंद्र तारे सेवानिवृत्त होऊन घरी परतत असताना ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत महिला, पुरुष यांनी मोठ्या उत्साहात औक्षण करून भारत माता की जय ,वंदे मातरम ,जय जवान जय किसान असे देशभक्तीपर गीत व नारे देऊन स्वागत करण्यात आले व भारत मातेच्या फोटो प्रतिमेचे तसेच शहीद जवान ,महापुरुषांच्या, संतांच्या, फोटो प्रतिमेचे पूजन सेवानिवृत्त सैनिक भालचंद्र तारे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सिंदखेडराजा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज कायंदे यांनी उपस्थिती दर्शवून देश सेवा करून आलेल्या तारे कुटुंबीयांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार सन्मान केला. यावेळी माजी आमदार तोतारामजी कायंदे हे सुद्धा उपस्थित राहून सैनिकाचा सत्कार केला. यावेळी राजू कुहीटे सरपंच , तेजराव लोढे पोलीस पाटील,गावातील व परिसरातील आजी, माजी सैनिक , लहान मुलं ,मुली ,महिला ,पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप तारे यांनी केले तर आभार प्रदर्शन रवी मोरे प्राध्यापक यांनी केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# निबंध स्पर्धेमुळे भगवान महावीर यांचे जीवनकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचेल - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आज जैन धर्म पश्चिम आणि उत्तर भारतात दिसत असला तरी एके काळी तामिळनाडू राज्यात जैन धर्मियांची संख्या मोठ्या प्रमाणात होती. तामिळ भाषेत जैन साहित्य देखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. तीर्थकर भगवान महावीर यांचे जीवनकार्य सर्वकाळ प्रेरणादायी असून भगवान महावीर यांच्या जीवनावर राज्यातील शाळाशाळांमधून निबंध स्पर्धा आयोजित केल्यामुळे भगवान महावीर यांचे जीवनकार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचेल, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज येथे केले.

भगवान महावीर स्वामी २५५० निर्वाण कल्याणाक महोत्सव समितीतर्फे राज्यातील शाळांमध्ये आयोजित निबंध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ राज्यपालांच्या हस्ते रविवारी (दि. २) राजभवन मुंबई येथे संपन्न झाला त्यावेळी ते बोलत होते.

भगवान महावीरांचे जीवन त्यागमय होते असे सांगताना केवळ स्वतःसाठी जगणे पाप असून इतरांसाठी जगल्यास ईश्र्वर आपली काळजी वाहिल असे राज्यपालांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले.

या स्पर्धेत राज्यातील शाळांमधील १.२ कोटी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला ही अतिशय उत्साहवर्धक बाब असल्याचे सांगून मुलांनी लिखाण तसेच वाचनाची सवय ठेवावी, अशी सूचना राज्यपालांनी यावेळी केली. मुलांनी मोबाईल फोनवर आपला वेळ वाया न घालवता वेळेच नियोजन करून मोबाईलचा वापर करावा अशी सूचना त्यांनी यावेळी केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शुभेच्छा संदेश वाचून दाखविण्यात आला.

कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मुलांच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम राजभवन येथे होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. अहिंसा परमो धर्म हा भगवान महावीरांचा संदेश घरोघरी पोहोचवण्यासाठी स्पर्धा उपयुक्त असल्याचे आमदार चैनसुख



संचेती यांनी सांगितले. स्पर्धेमुळे १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी भगवान महावीरांच्या जीवनाचे अध्ययन केले असे जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी यांनी सांगितले. यावेळी भगवान महावीरनिर्वाण कल्याणक महोत्सव समितीचे निमंत्रक हितेंद्र मोटा उपस्थित होते.

राज्यपालांच्या हस्ते स्पर्धेतील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या विजेत्यांना बक्षीस रकमेचे धनादेश प्रदान करण्यात आले. ही स्पर्धा जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात सहकार्य केल्याबद्दल नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा व मुख्य कार्यकारी अधिकारी अशीमा मित्तल यांचा देखील सत्कार करण्यात आला.

## संक्षिप्त...

### भाडेकरूंची माहिती पोलिसांना द्या अन्यथा भाडेकरू बांगलादेशी आढळल्यास गुन्हा दाखल करू - पोलिसांचा घरमालकांना इशारा



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली मधील पोलिसांनी बांगलादेशी नागरिकांविरोधात मोहीम तीव्र केली आहे. हे बांगलादेशी नागरिक ग्रामीण परिसरासह शहरी भागातील चाळ परिसरात भाड्याने घर घेऊन राहत असल्याचे समोर आले आहे . या पार्श्र्वभूमीवर पोलिसांनी ग्रामीण परिसरातील चाळमालक व घरमालकांची बैठक घेतली आहे. या बैठकीत आपल्या भाडेकरूंची माहिती पोलीस ठाण्याला देण्यात यावी. एखादा बांगलादेशी असल्याचे लक्षात येत असतात तात्काळ याबाबत पोलिसांचे संपर्क साधावा. अन्यथा भाड्याच्या घरांमध्ये बांगलादेशी नागरिक किंवा देशासाठी घातक कृत्य करणारा कोणी आढळला तर त्या घरमालकाविरोधात देखील गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशाराच पोलिसांनी दिलाय .

### संजय राऊत मूर्ख माणूस, खासदार नारायण राणे यांची टीका



**सिंधुदुर्ग /प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणारा संजय राऊत मूर्ख माणूस असल्याची टीका खासदार नारायण राणे यांनी केलीय. जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये देशाला चौदाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकावर आणले ते अर्थव्यवस्था समजत नाही म्हणून आणल का ? एका बंद खोलीत टीका करणं निंदा नालस्ती करणं हा संजय राऊतचा गुण आहे. त्याच्या कोणत्याही टीकेची दखल घेऊ नये. खासदार नारायण राणे यांनी राऊताना प्रत्युत्तर दिले आहे.

### कुंभमेळ्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या तरुणावर गुन्हा दाखल करण्याची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी/प्रतिनिधी :** प्रयागराज येथे सुरू असलेल्या कुंभमेळ्याबाबत आक्षेपार्ह आणि अश्र्लील वक्तव्य करणाऱ्या माजीद मंसुरी या तरुणाविरोधात निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बजरंग दल भिवंडीच्या वतीने वैभवमहाडिक यांनी या संदर्भात तक्रार दाखल केली असून, छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करत आरोपीला लवकरात लवकर अटक न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे. संबंधित तरुणाने सोशल मीडियावर ऑडिओ संदेशाद्वारे कुंभमेळ्याबाबत अश्र्लील भाषा वापरून धार्मिक भावना दुखावल्या आहेत. तसेच, हिंदू धर्मीयांविषयी आक्षेपार्ह विधान केल्याने परिसरात संतापाचे वातावरण आहे. या प्रकरणी पोलिसांनी तत्काळ कारवाई करून आरोपीला अटक करावी, अशी मागणी संतप्त नागरिक आणि विविध हिंदू संघटनांनी केली आहे. या घटनेमुळे धार्मिक तणाव निर्माण होण्याची शक्यता असून, पोलिस प्रशासनाने योग्य ती दक्षता घेतली असून पुढील तपास पोलीस करित आहेत. माहिती यावेळी देण्यात आली आहे.

### गोधरा हत्याकांडातील सैतान, पुण्यात केली भामटेगिरी, पोलिसांकडून अटक

**पुणे/प्रतिनिधी :** गुजरातमध्ये २००२ ला झालेल्या गोधरा हत्याकांडातील दोषी सलीम उर्फ सलमान युसुफ जारदा (५५) याला पुण्यातील एका चोरीच्या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. गोधरा हत्याकांडात दोषी ठरल्यानंतर कोर्टाने सलीमला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. परंतु गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये तो जामिनावर बाहेर आला. यानंतर तो फरार झाला होता. आता त्याला पुण्यातील एका चोरीच्या प्रकरणात अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जानेवारी रोजी पुण्यातील जुन्नर येथून एका ट्रकमधून सुमारे २ लाख ४९ हजार रुपयांचे टायर आणि ट्यूब चोरीला गेले होते. या प्रकरणात ट्रक चालक सोमनाथ गायकवाड यांनी एफआयआर दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास करत असताना, नाशिकमध्येही असाच एक प्रकार घडल्याचे पोलिसांना कळले. ज्यामध्ये पुण्यातील सिन्नर पोलीस ठाणे आणि मंचर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ट्रकमधून सामान चोरीला गेले होते. तपासादरम्यान, पोलिसांना या घटनांमध्ये एक आंतरराज्यीय टोळी सहभागी असल्याचे आढळून आले.

# खेलदरी शिवारात बिबट्या पडला विहिरीत, वनविभागाकडून बिबट्याला रेक्यु करुन जीवनदान

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** चांदवड तालुक्यातील आज रोजी दुपारी १२;३० वाजेच्या सुमारास खेलदरी शिवारातील वसंत शिवमन पारखे यांच्या जुन्या पडीत विहिरींमध्ये बिबट्या पडला अशी माहिती खेलदरी येथील प्रवीण गांगुर्डे यांना मिळाली यावरून त्यांनी घटनास्थळी पाहणी केली.

या घटनेची माहिती अँड राम पारखे व दत्तात्रय पारखे यांनी वन विभागाला भ्रमणध्वनी यावरून कळवली असता, उपवनरक्षक उमेश वावरे यांच्या आदेशानुसार सहाय्यक





वनरक्षक यांच्या व वनपरिक्षेत्र अधिकारी संजय वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर बिबट्याला पिंजरा लावून वन कर्मचारी व नागरिकांच्या मदतीने जिवंत बाहेर काढण्यात आले. तसेच या बिबट्याचा वावर या ठिकाणी डोंगर परिसरात असल्याचा व शेळ्या मेंढ्या वासरांची शिकार केलेली आहे असे देखील शेतकऱ्यांनी यावेळी सांगण्यात आले.

वनपाल वडनेर भैरव अजय शिंदे, वनरक्षक चंद्रकांत मार्गेपाड, वनरक्षक सुनील खंदारे ,वनरक्षक वाल्मीक व्हरगळ, वनरक्षक विजय टेकनार, वनमंजूर वसंत देवरे ,भारत वाघ ,वाहन चालक अशोक शिंदे, तसेच निफाड येथील रेस्क्यू टिमचे अधिकारी व कर्मचारी यांनी बिबट्याला बाहेर काढून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडून दिले.

### शिर्डीत मध्यरात्री खुनी थरार, साई संस्थांनाच्या दोन कर्मचाऱ्यांची निर्घृण हत्या

**शिर्डी/प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी याठिकाणी आज पहाटे तीन जणांवर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तीन वेगवेगळ्या ठिकाणी तीन लोकांवर हा हल्ला करण्यात आला आहे. तिघंही पहाटेच्या सुमारास कामावर जात होते, यावेळी दबा धरुन बसलेल्या मारेकऱ्यांनी हा हल्ला केला आहे. या हल्ल्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर तिसऱ्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एकाच रात्री तीन जणांवर अशाप्रकारे हल्ला झाल्याने परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे. ज्या तीन जणांवर हल्ले झाले, त्यातील दोघेजण शिर्डी येथील साई संस्थानाचे कर्मचारी आहेत. तर तिसरा जखमी तरुण देखील पहाटे एका खासगी कंपनीत ड्युटीवर जाताना त्याला टार्गेट करण्यात आलंय.

# अंबरनाथमध्ये भरदिवसा महिलेची चाकूने भोसकून हत्या

■ पूर्वेच्या हुतात्मा चौक परिसरातील घटना

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण /प्रतिनिधी :** पूर्वेच्या उड्डाणपुलाजवळ एका महिलेवर चाकू हल्ला करत तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना सोमवारी (ता.३) दुपारी घडली आहे. दिवसाढवळ्या हा चाकू हल्ला करण्यात आल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. सीमा कांबळे (४२) असं हत्या झालेल्या महिलेचे नाव असून आरोपी आणि महिला दोघेही शिवमंदिर परिसरातील बारकुपाडा येथे राहण्यास असल्याची माहिती सहाय्ययक पोलीस आयुक्त शैलेश काळे यांनी दिली.

दरम्यान अवघ्या काही





तासांच्या आतच पोलिसांनी आरोपी राहुल भिंगारकर या तरुणाला ताब्यात घेतले असून अटकेची कारवाई सुरू केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृत सीमाने राहुल यास पैसे दिले होते, मात्र राहुल पैसे देण्यास टाळाटाळ करत होता, त्यातून सीमा आणि राहुल हे पूर्वेच्या उड्डाणपुलाजवळ यासंदर्भात बोलत असतांना त्यांच्यात वाद झाले, त्या वादातून राहुलने सीमाची चाकूने भोसकून हत्या केली.

तसेच घटनास्थळावरून पसार झाला होता. घटनास्थळी शिवाजी पोलीसांनी धावघेत तपास करत आरोपी राहुल यास ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून अटकेची कारवाई सुरू आहे अशी माहिती सहायक पोलीस आयुक्त शैलेश काळे यांनी दिली आहे.

### आहेत का? हे त्यांनी तपासावे - प्रताप पाटील चिखलीकर



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** काही दिवसापूर्वी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्या मेळावा मध्ये अशोक चव्हाण यांनी असे वक्तव्य केले होते की भारतीय जनता पार्टीची ताकद नांदेड जिल्ह्यामध्ये जास्त असून कार्यकर्त्यांची जर इच्छा असेल तर आपण येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढू असा इशारा दिला होता त्या पाठोपाठ शिवसेनेने देखील स्वबळाचा नारा दिला आहे. यावरती लोहा कंधार विधानसभेचे राष्ट्रवादीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांची प्रतिक्रिया घेतली असता ते म्हणाले की अशोक चव्हाण हे भारतीय जनता पार्टीचे नेते आहेत का? आधी तपासावे व मग स्वबळाचा नारा द्यावा कारण आम्ही सध्या महायुतीचा घटक पक्ष म्हणून एकत्र आहोत सर्वस्व नेते मंडळी जी भूमिका घेतील त्या भूमिकेला आम्ही तयार आहोत पण आम्ही युती धर्म पाळणारे असल्यामुळे पक्ष जो आदेश देईल ते आम्हाला मान्य राहील अशी टीका अशोक चव्हाण वरती प्रताप पाटील चिखलीकर यांनी केली आहे.

आणि शक्तिपीठ महामार्गाला कोण विरोध करत आहे याचा तपास करून मी पुढील भूमिका स्पष्ट करणार आहे शक्तीपीठ महामार्गामुळे अनेक उद्योग दळणवळणाला साधन होणार असून हे देखील शेतकऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे असे देखील ते यावेळी म्हणाले.

# जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाच बांधारे विकास महामंडळाच्या अनाधिक कारभार व संघटित भ्रष्टाचाराच्या विरोधात अन्नत्याग सत्याग्रह

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :**
छत्रपती संभाजी नगर जलसंपदा विभागाच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात पाठपुरावे देऊन सुद्धा महाराष्ट्र शासनाने दखल घेतली नाही याबाबत प्रशासनाला विचारणा केली असता कारवाई सुरू आहे असे सांगण्यात येते गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळातील संघटित भ्रष्टाचार व अनागोदी कारवायाचे प्रमुख मुख्य अभियंते यांची विभागीय चौकशी व्हावी, ब्रह्मगव्हाण उपसा सिंचन योजनेच्या सर्व तक्रारीत कारवाई व्हावी वृक्षारोपण प्रकरणात विभागीय चौकशीचे नाव वगळण्यात येऊ नये, कारवाईस लवकर सुरुवात करावी, सिल्लोड येथील जमीन प्रकरणी सर्व समावेशक लेखी खुलासा करण्यात यावा, ब्रह्मगव्हाणच्या दोन्ही कालव्याच्या लायनिंगच्या कामात दोषीची विभागीय चौकशी व्हावी निंभोरा तालुका सोयगाव वृक्षतोड प्रकरणी कारवाई व्हावी ,२३ मुद्द्यांच्या तक्रारी शासनात सादर केलेल्या खुलास्याची प्रत देण्यात यावी व इतर मागण्यांसाठी आज छत्रपती संभाजीनगर येथील गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ सिंचन भवन येथे अन्नत्याग सत्याग्रह सुरू करण्यात आल्याचे शेतकरी संघटनेचे रऊफ पटेल यांनी सांगितले आहे.



## मुख्यमंत्र्यांनी घेतला फ्लॅगशीप योजनांचा आढावा

# प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलांच्या कामांना गती द्या - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ





**बुलडाणा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रासाठी १९ लाख ६६ हजार घरकुलांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यामध्ये आतापर्यंत १६ लाख ८१ हजार ५३१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन कामांना गती देण्याचे व घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील फ्लॅगशिप योजनांचा वॉररुममध्ये आढावा घेऊन या योजनांना गती देण्याचे निर्देश दिले. यामध्ये आरोग्य, गृहनिर्माण व पाणी पुरवठा विभागाच्या योजनांच्या सद्य़स्थितीचा आढावा आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी जिल्हानिहाय आढावा घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री पंकज भोयेर. योगेश कदम, मेघना बोर्डीकर, मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव उपस्थित होते. तर या बैठकीस बुलढाणा येथून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, कार्यकारी अभियंता राहुल जाधव, नगरविकास जिल्हा सह आयुक्त पेंटे, जिल्हा समन्वयक डॉ. विवेक सावके, तसेच नगरपरिषदांचे मुख्याधिकारी उपस्थित होते.

शहरी व ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन श्री. फडणवीस म्हणाले की, भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून देण्यात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. मात्र, उर्वरित लाभार्थ्यांना तातडीने जमिन उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकत्रितपणे मार्ग काढावेत. ज्या जिल्ह्यांत घरकुलांचे उद्दिष्टपूर्ती कमी आहे, तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ती पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावेत. तसेच घरकुल योजनेतील अडचणी दूर करून कामांना वेग द्यावे. गायरान जमिनींवरही आवास योजना राबविण्यासाठी कार्यवाही करावी.

आवास योजनांच्या घरकुलांसाठी वाळू, वीटा व सिमेंट आदी एकाच ठिकाणी मिळावे, यासाठी घरकुल मार्ट संकल्पना राबविण्यात यावी. यासाठी बचत गटांचे सहाय्य घ्यावे. तसेच आवास योजनांसाठी वाळू देण्यासंदर्भातील परिपत्रक पुन्हा निर्गमित करण्यात यावे. तसेच महसूल विभागाने गावठाणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. शहरी भागातील आवास योजनांना गती देण्यासाठी नगर विकास विभागाने स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश द्यावे. तसेच आवास योजनांच्या प्रगतीची माहिती नियमित अद्ययावत करावी. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा दोनची मंजुरी, कामे आदी कार्यवाहीही स्थानिक स्वराज्य संस्थांनी वेगाने करावे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी

आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व राज्य शासनाची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनांचा लाभ राज्यातील रुग्णांना मिळावा, यासाठी नोंदणीच्या कामाला गती द्यावे. तसेच यामधील मानवी हस्तक्षेप विरहित डिजिटल यंत्रणा सज्ज करावी. आयुष्मान कार्डच्या प्रत्यक्ष १०० टक्के वितरणाकरिता तांत्रिक अडचणी दूर करून आयुष्मान कार्डच्या वितरणाला गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.

जल जीवन मिशनची कामे वेगाने करा

जल जीवन मिशन योजना ही एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक उपलब्ध व्हावे यासाठी जलजीवन मिशन योजनेतील कामे गतीने, कालमर्यादेत व गुणवत्ता पूर्ण करावीत. या योजनांचे सोलारायजेशन झाल्यास वीजेबरोबरच वीज बिलात बचत होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

जिल्ह्यात सुरु असलेल्या केंद्र व राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजना गतीने सुरु आहेत. यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकूल, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, आयुष्मान कार्ड वितरण, जलजीवन मिशनअंतर्गत 'हर घर जल' ची कामे प्रगतीपथावर आहेत. घरकूलांच्या बाबतीत उद्दिष्ट गतीने पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. घरकुलांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे निर्देश यंत्रणांना देण्यात आले आहे. लाभार्थ्यांना ४ थ्या हप्त्याची रक्कम वितरित करण्याचे निर्देशही देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी घरकुलाचे प्रश्न मार्गी लावून कामे पूर्ण करण्यात येतील, असे बैठकीत सांगितले.

## विविध वृत्त...

### खामगाव शहरातील ४६ पाणटपरीधारकांवर कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** कोटापा कायद्याअंतर्गत जिल्हास्तरीय अंमलबजावणी पथकामार्फत खामगाव शहरातील ४६ पाणटपरीधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यात पथकाने बस स्टँड परिसर, तहसील कार्यालय, शाळा व महाविद्यालया जवळील परिसर, शहरातील शासकीय व निम शासकीय कार्यालयाच्या जवळचा परिसर अशा विविध ठिकाणी कारवाई करुन १७ हजार २०० रूपये दंड वसूल केला.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या आदेशान्वये जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली खामगाव पोलीस निरीक्षक पवार, अन्न व औषध प्रशासन विभागाचे वसावे, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे लखन सरकटे, अर्चना आराख यांच्या टीमने जिल्हास्तरीय अंमलबजावणी पथकाअंतर्गत कोटापा कायद्यातील कलमानुसार खामगाव शहरात ही कारवाई केली.

### 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेअंतर्गत फुटबॉल स्पर्धा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शासनाच्या बेटी बचाओ, बेटी पढाओ या योजनेला नुकतेच १० वर्ष पूर्ण झाले आहे. त्यानिमित्त जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा फुटबॉल संघटना यांच्या द्वारे जिल्हा फुटबॉल अकॅडमी व सेंट जोसेफ शाळेच्या मुलींच्या संघाचा जिल्हास्तर फुटबॉल खेळाचा सामना उत्साहात रंगला. या सामन्याचे आयोजन दि.२९ जानेवारी रोजी शारदा ज्ञानपीठ बुलढाणा येथे करण्यात आले होते. या सामन्यामधून मुलींमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी, शारीरीक दृष्ट्या सक्षम व्हावे हा संदेश पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच फुटबॉल या खेळाचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात आला. या सामन्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर, जिल्हा फुटबॉल संघटनेचे सरचिटणीस.एन.आर. वानखेडे , अध्यक्ष एस.एस. ठाकरे, महाराष्ट्र राज्य क्रीडा मार्गदर्शक डॉ जीवन मोहोड, क्रीडा अधिकारी.आर. धारपवार , एस.केळे,श मुकेश बाफणा, जोशी व कार्यालयाचे सर्व कर्मचारी, दोन्ही संघाचे मार्गदर्शक दिपीक्षा हिवाळे व दिलीप हिवाळे यांच्या उपस्थितीत या सामन्याचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये विजयी संघाला व उपविजयी संघाला प्रमुख अतिथी अध्यक्ष प्र.देशपांडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या सामान्याच्या आयोजनासाठी रमीज, मनोज श्रीनीवास, निसार,अतिक,शहबाज,राणा, इत्यादींनी स्पर्धेचे यशस्वीरित्या आयोजन केले.

### माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक, माजी सैनिक विधवा, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांनी विभागाच्या महासैनिक या (www.mahasainik.maharastra.gov.in) या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे अनिवार्य झाले असून माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता यांनी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

**नोंदणीसाठी लागणारी कागदपत्रे :** सेवा पुस्तिक (डिचार्ज बुक), माजी सैनिक ओळखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पास बुक, सर्व कुटुबांचे ईसीएचएस कार्ड, सर्वांचे आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो, कॅन्टीन कार्ड, पी.पी.ओ. जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेत सोमवार ते शुक्रवार व सैनिक मंगल कार्यालय, बुलढाणा येथे शनिवार व रविवार कागदपत्र जमा करावे. याशिवाय माजी सैनिकांच्या विविध तक्रारी अमृत जवान अंतर्गत तहसिलदाराच्या दालनात सोडविण्यात येणार आहेत.

**तालुका दौऱ्यांचे वेळापत्रक पुढील प्रमाणे :** मोताळा दि.६ फेब्रुवारी, मलकापूर ७ फेब्रुवारी, नांदुरा १० फेब्रुवारी , खामगांव ११ फेब्रुवारी, शेगांव १२ फेब्रुवारी, चिखली १३ फेब्रुवारी, मेहकर १४ फेब्रुवारी वार शुक्रवार, लोणार १७ फेब्रुवारी, सिंदखेडराजा १८ फेब्रुवारी, देऊळगांवराजा २४ फेब्रुवारी, संग्रामपूर २५ फेब्रुवारी, जळगांव जामोद २७ फेब्रुवारी, बुलढाणा येथे कार्यालयीन वेळेनुसार सोमवार ते शुक्रवार असेल.

### जालना शहर महानगरपालिका व पतंजली योग शिबीरामिती यांच्या संयुक्त विद्यमाने योग प्राणायाम शिबीरास प्रारंभ ०७ फेब्रुवारीपर्यंत राहणार शिबीराचे आयोजन

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहर महानगरपालिका व पतंजली योग शिबीर समिती यांच्या संयुक्त विद्यमाने योग प्राणायाम शिबीराचे आयोजन दिनांक ०३.०२.२०२५ ते दिनांक ०७.०२.२०२५ पर्यत रोजी सकाळी ०६.०० ते ७.३० या वेळेत स्व. कल्याणराव घोगरे स्टेडियम या ठिकाणी केले जाणार आहे. सदरील शिबीरास आज दिनांक ०३.०२.२०२५ पासुन प्रारंभ सुरुवात झाली. यावेळी जालना मनपाचे आयुक्त तथा प्रशासक श्री. संतोष खांडेकर यांनी दिपप्रज्वलन केले. सदर शिबरामध्ये पतंजली योग समितीसह राज्य प्रभारी योग शिक्षक प्रल्हाद माऊली हरबक, माजी उपाध्यक्ष श्री. राजेश राउत, माजी नगरसेविका श्रीमती संध्या संजय देठे, अतिरिक्त आयुक्त श्रीमती प्रीयंका राजपुत, उपायुक्त नंदा गायकवाड, सहायक आयुक्त सुप्रीया चव्हाण, सहायक आयुक्त अपर्णा जाधव, कार्यालयीन अधिक्षक श्री. विजय फुलंब्रीकर, मालमत्ता विभाग प्रमुख श्री. राहुल देशमुख, स्वच्छता विभाग प्रमुख श्री. पंडीत पवार, अभियंता श्री. अशोक कटारे, लिपीक श्री. संजय भालेराव, श्री. मोहन जामदार, बंडु चव्हाण, अजय पेंबार्ती तसेच मनपातील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



### केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केला शुटिंग बॉल स्पर्धेत नेत्रदिपक कामगिरी करणाऱ्या गौरी म्हस्के हीचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** नेपाळ येथे झालेल्या शूटिंग बॉल स्पर्धेमध्ये नेत्रदीपक कामगिरी करत भारतीय संघाला विजय मिळवून दिल्याबद्दल गौरी म्हस्के हिच केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी अभिनंदन करत सत्कार केला आहे.

नेपाळ येथे १ आणि २ फेबुवारीला संपन्न झालेल्या शूटिंग बॉल स्पर्धेमध्ये गौरी म्हस्के हिने भारत पाकिस्तान सामन्यामध्ये दमदार कामगिरी करत भारताला विजयश्री मिळून दिला त्यामुळे तिची निवड विश्व कप शूटिंग बॉल स्पर्धे साठी झाली आहे गौरी म्हस्के ही बुलढाणा जिल्ह्यातील पंढरदेव येथील रहिवासी असून ती शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख मायाताई म्हस्के यांची कन्या आहेत नेपाळ येथे झालेल्या भारत नेपाळ , भारत-बांगलादेश आणि भारत पाकिस्तान या शूटिंग बॉल सामन्यांमध्ये तिने व तिच्या संघाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे भारताला विजय मिळाला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी गौरी म्हस्के हिचे कौतुक करत तिच्या टीमनेचे ही अभिनंदन केला आहे.

### रेल्वे प्रवाशांवर झालेल्या हल्ल्यात जखमी असलेले युवकाचा मृत्यू, नातेवाईकांचा आक्रोश

दैनिक आपला विदर्भ



**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार रेल्वे स्टेशन येथे जोधपुर चेन्नई रेल्वेत प्रवाशांच्या भांडणातून नंदुरबार रेल्वे स्थानकावर दोन राजस्थानी प्रवाशांवर स्थानिक आठ ते दहा इसमांनी जीव घेणा हल्ला केला होता याच्यात चाकूने वार देखील करण्यात आले होते त्यात दोन इसम गंभीर जखमी झाले होते. जखमी इसमांवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू होता मात्र उपचारा दरम्यान एका प्रवाश्याचा दुर्दैवी अंत झालाय. सुमेर सिंग २६ वर्ष असे मृत्यू झालेला युवकाचे नाव आहे. मृत्यू झाल्यानंतर नंदुरबार जिल्हा रुग्णालयात नातेवाईकांनी गर्दी केली आहे. दरम्यान या घटनेमध्ये आठ ते दहा आरोपी असून या आरोपीं वर ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटना ही बसण्याच्या वादातून घडली असल्याचे निदर्शनास आले आहे त्यातील एका युवकाचा मृत्यू झाला आहे. आरोपीं निष्पन्न झाले असून त्यांना लवकर अटक करण्यात येईल असे लोहमार्ग पोलीस विभागाचे उपविभागीय अधिकारी सूर्यकांत बांगर यांनी सांगितले .दरम्यान आरोपीनी जो पर्यंत अटक करत नाही तो पर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही असे मृत युवकांच्या परिवारातील लोकांनी सांगितले.

### दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धांचे बुधवारी आयोजन

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण कार्यालयामार्फत जिल्ह्यातील सर्व प्रवर्गाच्या सर्व दिव्यांग शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा बुधवार दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता पोलीस परेड ग्राऊंड येथे आयोजित करण्यात आल्या आहेत, अशी माहिती जिल्हा समाज कल्याण अधिकारी संभाजी पोवार यांनी दिली आहे.

## जैविक कचरा प्रकरणी कारवाई करण्यास विलंब ;

# अधिकारी म्हणतो उद्याला कारवाई करतो

**आरोग्य विभाग ही खेळतो का नागरिकांच्या जीवाशी..?**

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : मानवी शरीरासाठी घातक असलेला जैविक कचरा अज्ञात व्यक्तीने येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीलगत टाकून त्या जैविक कचऱ्याला आग लावल्याची घटना २ फेब्रुवारी रात्री अकरा वाजे दरम्यान घडली. सदर प्रकरणे अत्यंत गंभीर असतानाही या प्रकरणी आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने कारवाई करण्यात आल्याने यामध्ये काय गोडबंगाल आहे.असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर जैविक कचरा प्रकरणी सबंधित वरिष्ठ विभागाशी संपर्क साधला असता या प्रकरणी उदयाला कारवाई करतो अशी माहिती दिली.**



मात्र,आजचा दिवस का टाळला असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती लगतच अज्ञात व्यक्तीने भला मोठा जैविक कचरा टाकला. त्या जैविक कचऱ्यामध्ये अनेक प्रकारचे सलाईन सोनोग्राफी, इंजेक्शन, औषधी बाटल्या व इतरही साहित्य होते. हा जैविक कचरा मानवी शरीरासाठी मोठा घातक मानला जातो. अशा घातक कचऱ्याला रस्त्यावरच रस्त्याच्या कडेलाच नष्ट करण्याचा काम अज्ञात व्यक्तीने केल्याचे प्राथमिक आरोग्य केंद्रा असलेल्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले.त्यांनी त्या ठिकाणी तत्काळ धाव घेतली व जैविक कचऱ्याला लागलेली आग विझवली. तर, या अगोदरही सन २०२३ मध्ये डोणगाव येथील मादणी रस्त्यालगत असलेल्या नदीच्या पुलाच्या बाजूलाच जैविक कचऱ्या फेकण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. सदर प्रकरणे आरोग्य विभागाच्या टीमने घटनास्थळी जाऊन पंचनामा केला होता. मात्र, त्यापुढे या पंचनामाचे काय झाले. हे फक्त पंचनामा करणाऱ्या व्यक्ती पर्यंतच मर्यादित राहिले. आरोग्य विभाग नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा प्रकार सुरू असून याकडे आरोग्य विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे मात्र अक्षम्य दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. जैविक कचरा नष्ट करण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने नियमावली लागू केली आहे. त्या नियमावलीनुसार जैविक कचरा नष्ट करणे गरजेचे असताना डोणगाव येथे मात्र जैविक कचऱ्यामुळे मनमानी पद्धतीने वाटेल तिथे कचरा फेकून देऊन त्याची विल्हेवाट लावली जात आहे. या जैविक कचऱ्यामध्ये अनेक प्रकारचे संशयास्पद अहवाल सुद्धा असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत असून आरोग्य विभागातील हा गैरप्रकार बाहेर येऊ नये यासाठी हा जैविक कचरा रस्त्यावर फेकून देत जाळाला जात असल्याचे बोलले जात आहे.



दैनिक आपला विदर्भ

आरोग्यास घातक असणारा वैद्यकीय जैव कचरा फेकणाऱ्यावर कधी होणार कारवाई..

वैद्यकीय अधिकारी म्हणतात चौकशी चालूच..वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष नाही का.? की मुद्दाम कली जाते कारवाईत दिरंगाई

आपला विदर्भ :प्रतिनिधी

बुलढाणा. डोणगाव येथील मादणी रस्त्यालगत असलेल्या नदीच्या पुलाच्या बाजूलाच फेकण्यात आलेल्या वैद्यकीय जैव कचऱ्या च्या मुळे आरोग्यास मोठा धोका निर्माण झाला असल्याचे वृत्त आपला विदर्भ ने दिनांक 9 सप्टेंबर 2023 रोजी प्रकाशित करून संबंधित विभागाच्या ही गंभीर बाब लक्षात आणून दिली. मग चालू झाली आरोग्य विभागाची चौकशी घटनास्थळावर आरोग्य विभागाची टीम सुद्धा आली मात्र पुढे काय चौकशी.मात्र आता एक महिना उलटून सुद्धा कारवाई न झाल्यामुळे आरोग्य विभाग नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप आता डोणगावातील सुज्ञ नागरिक करीत आहेत.... मात्र पुढे काय चालू आहे चोकशी..

त्या जैव वैद्यकीय कचरा फेकणाऱ्यावर कारवाई होण्याचे संकेत..

काय म्हणतात तालुका वैद्यकीय अधिकारी..

दैनिक आपला विदर्भ मध्ये प्रकाशित झालेल्या बातमीच्या अनुषंगाने आरोग्य विभागाची टीम घटनास्थळी पोहोचले व त्या ठिकाणचे सॅम्पल घेतले यावर आमची चौकशी चालू आहे. चौकशी दरम्यान तालुका वैद्यकीय अधिकारी हे दिनांक. ४ ऑक्टोबर रोजी डोणगाव येथे येऊन जे हॉस्पिटल अधिकृत सर्व रित्या सक्षम व अतिशय व्यवस्थित रुग्णसेवा देतात त्याच हॉस्पिटलला विजिट दिली त्या ठिकाणी सर्वच काही व्यवस्थित दिसून आले. मात्र प्रश्न पडला की तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी इतर हॉस्पिटल क्लिनिक ला का भेट दिली नाही. की फक्त उपरा उपरी या गंभीर प्रकरणाची चौकशी चालू आहे..? आपला विदर्भ शी बोलताना तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले की आम्ही लवकरच स्वाजगी डॉक्टरांची मीटिंग डोणगाव या ठिकाणी लावणार आहोत मी माझ्या परीने पूर्ण चौकशी करून वरिष्ठांना अहवाल सादर केले आहेत.... आणि चालू आहे चौकशी

का करण्यात आले नाहीत डोणगावातील सर्वच क्लिनिक हॉस्पिटल व पॅथॉलॉजी चेक

डोणगाव मध्ये छोटे-मोठे क्लिनिक व पॅथॉलॉजी व हॉस्पिटल बऱ्याच आहेत मात्र तालुका वैद्यकीय अधिकारी यांनी इन मीन तीन हॉस्पिटलाच विजिट दिली अंसावी इतर पॅथॉलॉजी क्लिनिक हॉस्पिटल हे सुद्धा चेक करण्यात का नाही आले काय दडले यामध्ये आरोग्य विभाग का करत आहे दिरंगाई असे एक ना अनेक प्रश्न आता निर्माण होत आहेत..

गावोगावी चालू असलेल्या डॉक्टरांची प्रॅक्टिस मधून निघत असलेल्या वैद्यकीय जैव कचऱ्याचे काय... लवकरच पुढील भागात तूर्तास एवढेच

10 Oct 2023 - Page 1 | www.aapalavidarbh.com

### अधिकारी म्हणतात उद्या कारवाई करू

येथील जैविक कचरा प्रकरणी संबंधित जोशीवर गुन्हा दाखल करून कारवाई करण्याची आवश्यकता असताना अधिकाऱ्यांनी मात्र, याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे अनेक शंका कुशंका निर्माण होत आहेत. रस्त्यावर जैविक कचरा टाकून जाळण्यात आलेल्या असला तरी या जैविक कचऱ्यामध्ये अनेक संशयास्पद अहवाल सोनोग्राफी तसेच इतर साहित्य असल्याचे नागरिकाचे म्हणणे असून यामध्ये अनेक गैरप्रकारातून हा जैविक कचरा रस्त्यावर आणून जाळला असल्याची चर्चा आहे. याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने दखल घेत सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करावी, अशी अपेक्षा डोणगाव येथील नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.